Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

मानसपूरी येथे खोदकामात आढळलेले शिवमंदिर

डॉ. अनिल कठारे
प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कॉलेज, कंधार.

प्रस्तावना :

नांदेड जिल्ह्यात कंधार तालुक्यात मानसुपरी हे खेडेगाव असून हे गाव कंधार शहरापासून साधारणपणे एक कि.मी. अंतरावर आहे. हे गाव ऐतिहासिक असून याठिकाणी मोठ्या प्रमाणात पुरातत्त्वीय अवशेष मिळाले आहेत. याच ठिकाणी गावच्या उत्तरेस विठोबा भगवानराव मानसपुरे यांच्या शेतात खोदकाम करीत असताना २४ फेब्रुवारी २०१७ रोजी एकदम चांगल्या स्थितीत जमिनीत गाडले गेलेले शिवमंदिर आढळून आले. त्याचाच आढावा या शोधनिबंधात घेतला आहे.

कंधार व परिसरातील बारा पूर :

कंधार हे नगर राष्ट्रकुट सम्राट कृष्ण पहिला यांनी इ.स. ७५८ मध्ये स्थापन केले. हे नगर राष्ट्रकुटांची राजधानी होती. प्राचीन व मध्ययुगीन काळात कंधार शहरात आणि आसपास बारा पुर होते. पुर म्हणजे वसाहत किंवा गाव होय. हे सर्व बारा पुर कंधारचाच एक भाग होते. मानसपुरी, नवरंगपुरा, बहाद्दरपुरा, गवळीपुरा, तेलंगपुरा, शेकापूर, जंगमपूर (जंगमवाडी), रायपूर (रायवाडी) व हत्तीपुरा ही ऐतिहासिक स्थळे प्राचीन कंधारचाच एक भाग होती. मध्ययुगात कंधार शहरात दर्गापुरा, फंकिरापुरा व सुलतानपुरा या तीन पुरांची भर पडली. या सर्व ठिकाणी तत्कालीन पुरातत्त्वीय अवशेष आढळतात. मानसपुरी जवळच बहाद्दरपुरा आहे. ७ मे १६३१ रोजी मोगल सम्राट शहाजहान नासिरखानच्या नेतृत्वाखाली पाठविलेल्या सैन्याने अहमदनगरच्या निजामशाहीकडून कंधार किल्ला[२] जिंकुन घेतला. मोगल किल्लेदार बहादरूखान यांनी किल्ला जवळ मन्याड नदीच्या उत्तर किनाऱ्यावर एक वसाहत अर्थात पूर अर्थात गाव स्थापन केले. हेच पूर अर्थात गाव त्यांच्याच नावावरुन बहाद्दरपूरा या नावाने प्रसिध्दीस आले. बहादूरचा अपभ्रंश बहाद्दर असा झाला.

मानसपुरीचे पुरातत्त्वीय महत्त्व :

मानसपुरी हे गाव प्राचीन असून या ठिकाणी राष्ट्रकुट काळापासून ते यादव काळापर्यंतचे अवशेष मिळाले आहेत. यामध्ये बौध्द स्तुपाचे अवशेष, हिंदू मंदिर स्थापत्याचे अवशेष आणि हिंदू, जैन व बौध्द मुर्तिशिल्प व त्यांच्या अवशेषांचा समावेश होतो. येथे मिळालेले बौध्द स्तुपाचे अवशेष हे उद्देशिक स्तुपाचे अवशेष आहेत. येथेच धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुध्द मुर्तिशिल्प मिळाले. डेक्कन कॉलेज पुणे व महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने फेब्रुवारी १९८२ मध्ये येथे सर्व्हे नंबर २७९ मोहनराव इरवंतराव मानसपुरे आणि विठ्ठल विश्वनाथराव मानसपुरे यांच्या शेतात डॉ. शोभना गोखले व डॉ. मधुकर ढवळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खनन केले. या उत्खननात क्षेत्रपाल भैरव मंदिराची वास्तू[३] आढळून आली. ही वास्तू मानवी आकाराची घडीव दगडाची होती. तिची लांबी २३ मीटर व रुंदी ७ मीटर होती. ही वास्तू इ.स. ९०० मधील आहे.

शिवमंदिर कोठे मिळाले ?

मानसपुरी गावच्या उत्तरेस साधारणपणे दीड कि.मी. अंतरावर विठोबा भगवानराव मानसपुरे यांचे शेत अर्थात जमीन आहे. ही जमीन सर्व्हे नंबर २७९ मध्ये आहे. ही जमीन समान पातळीवर नसून उतरती आहे. जमिनीच्या वरच्या बाजूस चढ आहे. आणि तेथे मोठ्या आकाराचा बांध अर्थात धुरा आहे. या जमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम जमिन मालक विठोबा मानसपुरे यांनी हाती घेतले. त्यासाठी त्यांनी जेसीपी मशीन शेतात आणली. जेसीपीने जमिनीचे सपाटीकरण सुरु केले. त्याच वेळी जमिनीच्या चढत्या भागात बांधालगत शुक्रवार दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी जेसीपीला मंदिराच्या वास्तूचा स्पर्श झाला. त्यामुळे याठिकाणी जेसीपीने काळजीपूर्वक खोदकाम केले असता शिवमंदिराची संपूर्ण वास्तू[४] चांगल्या स्थितीत आढळून आली. येथुन साधारणपणे एक हजार मीटर अंतरावर फेब्रुवारी १९८२ मध्ये उत्खननात मिळालेले क्षेत्रपाल भैरव मंदिराच्या वास्तुचे अवशेष मिळालेले आहेत.

मंदिर का गाडले गेले ?

जमिनीत खोदकामात आढळलेले शिवमंदिर जमिनीत का गाडले गेले ? या बाबत काही तर्क काढता येतात. मानवी वसाहतीवर सातत्याने येणारी दोन नैसर्गिक संकटे आहेत. ती संकटे महापूर आणि भुकंप ही आहेत. भुकंपामुळे मोठमोठी नगरे जमिनीत गाढली गेली. तसेच नदिला आलेल्या महापुरामुळे सुध्दा मोठमोठ्या मानवी वसाहती उध्दवस्त झाल्या आणि जमिनीत गाडल्या गेल्या. ज्या ठिकाणी शिवमंदिर खोदकामात आढळले. तो जमिनीचा भाग चढतीवर आहे आणि खालच्या भागात लाल बाग नावाचा तलाव आहे. हा तलाव प्राचीन आहे. या तलावात ज्या बाजुस शिवमंदिर मिळाले त्या बाजुकडून आणि उत्तरेकडून माळरान परिसरातून पावसाचे पडलेले पाणी उताराने वाहत येते. तलावाच्या पूर्व बाजुस शिवमंदिर मिळाले आहे. मिळालेले शिवमंदिर आणि तलाव यांच्या दरम्यान उतरणीचा भाग असून याच भागातून प्राचीन काळात नदी वाहत असावी. हीच नदी मानसपुरीच्या गावालगत पूर्व बाजुकडून वाहत होती. आजही ही नदी गावालगत पूर्व बाजुकडूनच वाहते. या नदीचा प्रवाह मात्र गाळामुळे सपाट झालेला दिसतो. या नदीस आलेल्या महापुरात हे शिवमंदिर गाळात अर्थात जमिनीत गाडले गेल्याची शक्यता आहे. शत्रुपासून मंदिराचे संरक्षण करण्यासाठी ते जमिनीत गाडणे शक्य नाही.

शिवमंदिराची रचना व स्वरुप :

जमिनीत खोदकामात आढळलेले शिवमंदिर चांगल्या स्थितीत मिळालेले आहे. खोदकामात केवळ मंदिराचे गर्भगृह व त्यामध्ये शिवलिंगासह शिवपींड आढळून आली. येथे प्राप्त झालेल्या अवशेषावरुन या शिवमंदिराची रचना अर्थात पदविन्यास लक्षात येतो. गर्भगृह, अंतराळ आणि मंडप[५] असा या शिवमंदिराचा पदविन्यास असण्याची शक्यता आहे. आज मात्र केवळ गर्भगृह पाहावयास मिळते. खोदकाम केल्यास अंतराळ व मंडपाचे भग्नावशेष मिळू शकतात. शिवमंदिराचे गर्भगृह आठ बाय आठ चौरस फुट असून ते पूर्वाभिमुख आहे. शिवमंदिराच्या बांधकामासाठी मोठमोठ्या दगडी शिळांची रुंदी एक ते दीड फुट, उंची एक फुट आणि लांबी पाच ते सहा फुट आहे. पृष्ठभागापासून छतापर्यंतची उंची आठ फुट आहे. गर्भगृहावर मोठमोठ्या दगडी शिळापासून तयार केलेले छत आहे. छतावर शिखर असले पाहिजे. परंतु ते पडले असावे. त्यामुळे त्याची कल्पना येत नाही. गर्भगृहात उत्तराभिमुख शिवलिंगासह शिवपिंड आहे. ती काळ्या दगडात घडविली आहे. गर्भगृहातील शिवपिंडीवरील पाणी बाहेर जाण्यासाठी उत्तरेकडील भिंतीत घडीव दगडात नाली कोरली आहे. याच भिंतीत दिवा ठेवण्यासाठी एक दगड बसविला आहे. मंदिराच्या बांधकामासाठी चुन्याचा वापर केलेला दिसत नाही. शिवमंदिराच्या प्रवेशद्वाराची रुंदी दोन फुट व आणि उंची ४ फुट आहे. दिवार पट्टीवर अस्पष्ट गणेश शिल्प दिसते. प्रवेशद्वारावर कसल्याही प्रकारची कोरीव काम आढळत नाही. दोन्ही बाजुकडील द्वारपट्टीवर मात्र वेलपत्री कोरल्याचे आढळते.

मंदिराचा कालखंड :

जमिनीत खोदकामात आढळलेल्या या शिवमंदिराचा कालखंड आपल्याला या मंदिराच्या बांधकाम शैली आणि रचनेवरुन ठरविता येतो. कंधार या ठिकाणी राष्ट्रकुट आणि यादव काळातील अवशेष मोठ्या प्रमाणात आढळून आले. राष्ट्रकूट काळात याठिकाणी एकूण बारा[६] मंदिरे बांधण्यात आली असून बारा मंदिरांचा उल्लेख कंधार शिलालेखात आढळतो. ही बारा मंदिरे आज अस्तित्वात नसली तरी त्यांचे स्थळ निश्चित करण्यात आलेल्या मंदिराच्या जवळच अलिकडे क्षेत्रपाल भैरवाचे मंदिर भग्नावशेष रुपात मिळाले. या मंदिराचा उल्लेख कंधार शिलालेखात[७] आढळतो. राष्ट्रकुट काळातील दुसरे मंदिर मानसपुरी येथे असल्याचा उल्लेख शिलालेखात आढळत नाही. याचा अर्थ खोदकामात आढळलेले मंदिर राष्ट्रकुट काळातील नाही हे स्पष्ट होते. यादव काळात कंधार हे देश विभागाचे केंद्र[९] होते. यादव काळात याठिकाणी मंदिरेही निर्माण केली. या काळात सुरुवातीच्या काळात बांधलेली मंदिरे साध्या स्वरुपाची व शैलीची होती. अशा मंदिराच्या छतावर स्तंभावर, प्रवेशद्वारावर व बाह्यभागावर कोरीव काम व मुर्तिशिल्प आढळत नाही. मंदिर बांधकामाची ही या काळातील प्राथमिक अवस्था होती. उत्तरार्धात बांधण्यात आलेली मंदिरे कलाकुसरीने व मुर्तिशिल्पांनी सुशोभित केलेली दिसतात. प्रवेशद्वार कोरवीकाम करुन सजविलेले दिसते. छत, स्तंभ आणि गर्भगृहाच्या बाह्यभागावर कोरीव काम व मुर्तिशिल्प आढळते. खोदकामात आढळून आलेले मंदिर साध्या स्वरुपाचे अर्थात शैलीचे आहे. बांधकामासाठी चुना वापरलेला आढळत नाही. प्रत्येक दगडास खाच ठेन दगड एकमेकावर रचून या शिवमंदिराची रचना केली आहे. या मंदिराच्या साध्या बांधकाम शैलीवरुन ते यादवकाळातील सुरुवातीच्या काळातील म्हणजेच इ.सनाच्या बाराव्या शतकातील असावे.

निष्कर्ष :

१) मानसपुरी हे ऐतिहासिक स्थळ असून येथे प्रामुख्याने राष्ट्रकुट काळातील पुरातत्त्वीय अवशेष आढळून आले आहेत.

२) मानसपुरी याच ठिकाणी इ.स. १९५९ मध्ये राष्ट्रकुट सम्राट कृष्ण तिसरा यांच्या काळातील एक शिलालेख मिळाला. हाच कंधार शिलालेख आहे.

३) कंधार शिलालेखात राष्ट्रकुट राजघराणे व कंधार शहराचे वर्णन आढळते. याच शिलालेखात मानसपुरी येथील क्षेत्रपाल भैरवाचे मंदिराचे भग्नावशेष मिळाले.

४) क्षेत्रपाल मंदिराच्या जवळच वरील बाजुस चढतीवर जमिनीत खोदकाम करताना शिवमंदिर आढळून आले.

५) हे शिवमंदिर महापुरामुळे आलेल्या गाळात गाडले गेले.

६) हे शिवमंदिर बांधकामाच्या दृष्टीने अगदी साध्या स्वरुपाचे आहे. मंदिराच्या बाह्य भागावर व आतील बाजूस तसेच प्रवेशद्वारावर कसल्याही प्रकारचे कोरीव काम आढळत नाही. यादव काळात सुरुवातीला अशा स्वरुपाची मंदिरे बांधण्यात आली. हेही मंदिर यादव कालखंडातील पूर्वार्धातील असून ते इ.सनाच्या बाराव्या शतकातील असावे.

संदर्भ सूची :

१. Sircar D.C. (Edi.), Select Inscriptions. Vol. II, Delhi, Motilal Banarasidas, 1983, p.572.

२.डॉ. कुंटे भ.ग. (मराठी अनुवादक), दिल्लीच्या शहाजहानचा इतिहास, मुंबई, महाराष्ट्र राज्या साहित्य व संस्कृती मंडळ, १९८९, पृ. १६८.

३.राजन अमिताभ व इतर (संपादक), स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध नांदेड, नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, १ मे १९८६, पृ. ३८.

४. प्रत्यक्ष सर्वेक्षण, दि. २४ फेब्रुवारी २०१७.

५. कित्ता.

६. Sircar D.C.(Edi.), op. cit.

७. Ibid.

८.तुळपुळे शं.गो. (संपादक), प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे, पुणे विद्यापीठ, ऑगस्ट १९६३, क्र. ३१, पृ.१५३, १५५.